**-: प्रेसनोट :-** दिनांक : ०७/०४/२०२२

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | २४/२०२२ |
| कलम | कलम ७, ७ (अ) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | १) श्री. संदिप रविंद्र गायकवाड, वय ४६ वर्षे, व्यवसाय–वैद्यकिय आरोग्य अधिकारी, बी वॉर्ड, बृहन्मुंबई महानगर पालिका, सर जे.जे.रुग्णालयासमोर, डोंगरी, मुंबई–४००००९<br>२) श्री. सचिन महादेव कोकितकर, वय ३६ वर्षे (खाजगी इसम), रा.ठी. बी/४०५, ४था मजला, नवीन गौरव सोसायटी, डोंबिवली (पुर्व), ठाणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. ३०००/– |
| स्विकारलेली रक्कम | रू. ३,०००/– |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचा हॉटेल व्यवसाय असुन, सदर हॉटेल सन २०१८ साली फिर्यादी यांनी विकत घेतले होते. फिर्यादी यांना जुन्या मालकाच्या नावावर असलेले हेल्थ लायसन्स स्वत:च्या नावावर हस्तांतरीत करणे, हॉटेलचे डिझेल इंधन आधारीत भट्टीचे एल.पी.जी.मध्ये रुपांतर करणे, पत्त्यामध्ये पिन कोड दुरुस्त करणे याकरीता 'बी वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई येथे अर्ज केला होता.<br>सदर कामासाठी फिर्यादी यांचेकडे लोकसेवक श्री. संदिप गायकवाड यांनी रु. ५०,०००/– लाच मागितली होती. त्यामुळे फिर्यादी यांनी त्यांचे काम करण्याकरीता तक्रार देण्यापुर्वी लोकसेवक श्री. संदिप गायकवाड यांना रु. ४०,०००/– दिले होते.<br>त्यानंतरही सदरहू कामाकरीता अग्निशमन दलाचे ना हरकत प्रमाणपत्राकरीता अग्निशमन दलास पत्रव्यवहार करण्याकरीता तसेच पिन कोड दुरुस्तीकरीता रु. ३,०००/– आणखी रक्कमेची मागणी केली. तक्रारदार यांना लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी ला.प्र.वि., मुंबई कार्यालयात समक्ष हजर राहून तक्रार केली.<br>प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने दिनांक ०६/०४/२०२२ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेवक क्र. १ संदिप गायकवाड यांनी रु ३,०००/– रक्कमेच्या लाचेची मागणी करुन खाजगी इसम श्री. सचिन महादेव कोकितकर यांच्याकडे सदर प्रलंबित काम पुर्ण करण्याकरीता पैसे देण्यास सांगितले. त्याप्रमाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई मार्फत करण्यात आलेल्या सापळा कारवाईदरम्यान खाजगी इसम श्री. सचिन महादेव कोकितकर यांना रु. ३,०००/– स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आल्याने, लोकसेवक व खाजगी इसम यांचेविरूध्द गुन्हा नोंद करून दोघांना अटक करण्यात आली आहे. |

07/04/22

( संजय पाटील )
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबधंक विभाग,
मुंबई विभाग.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागाकडे संपर्क साधावा.

संपर्क : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, ९१, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई– ३०.
संकेतस्थळ–acbmaharashtra.gov.in
ईमेल :(1) acbwebmail@mahapolice.gov.in, (2) addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
ऑन लाईन तक्रार ॲप्लीकेशन- www.acbmaharashtra.net
टोलफ्री क्र.१०६४
दूरध्वनी क्र.०२२–२४९२१२१२,फॅक्स क्र.०२२–२४९२२६१८,
व्हॉट्स ॲप क्रमांक–९९३०९९७७००

Scanned with CamScann